405

**महाराष्ट्र शासन**

**क्र.एमएसआरएलएम/लेखा/ 4674 /२०२२**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**ग्रामविकास विभाग,**
**पाचवा मजला, सिडको बिल्डींग,**
**(साऊथ विंग), कोकण भवन,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**
**दि. 28 /०९/२०२२**

**प्रति,**
**जिल्हा अभियान संचालक,**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सर्व जिल्हे**

**निधी वितरण आदेश क्र. - 439**

**विषय -: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान इंन्टेनसिव्ह (NRLM - Intensive) जिल्हयांना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता निधी (Fund Limit) मर्यादा उपलब्ध करुन देणेबाबत**

**संदर्भ -:** १. भारत सरकार, ग्रामविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. File No. J-११०६०/३८/२०२१-RL (E-३७८५१६) दिनांक ११/०५/२०२२ अन्वये

२. आपल्या जिल्हयाचा सन २०२२-२३ चा मंजुर वार्षिक कृती आराखडा (AAP)

महाराष्ट्र राज्यात सन २०११ पासून राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही योजना राबविण्यास सुरुवात झालेली आहे. संदर्भीय पत्र क्र. १ नुसार सर्व केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) यांचे निधीचे प्रभावी व्यवस्थापन होण्यासाठी तसेच सार्वजनिक खर्चाचे उत्तम व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीने राज्यात प्रत्येक केंद्र अनुदानित योजना (Centrally Sponsored Schemes) चे Single Nodal Agency (SNA) या पध्दतीची दि. ०१/०७/२०२१ रोजी पासुन अंमलबजावणी करण्याबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने सदर योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) कार्यप्रणाली लागु करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हयाला यानंतर निधी वितरीत न करता निधीची मर्यादा (Fund Limit) PFMS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय नियंत्रण समिती तसेच राज्यस्तरीय सर्वसाधारण समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) योजनेचा निधी मर्यादा (Fund Limit) PFMS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, अहमदनगर अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदीया, हिंगोली, जालना, जळगाव, कोल्हापूर, लातुर, नागपुर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम, यवतमाळ यांना वित्तीय वर्ष २०२२-२३ करीता रक्कम रु. १०२,६४,१८,०००/- (अक्षरी एकशे दोन कोटी चौसष्ट लाख अठरा हजार मात्र) इतकी निधी मर्यादा (Fund Limit) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. निधीचा पुढील हप्ता प्राप्त होताच उर्वरीत निधी वितरीत करण्यात येईल. सदरील निधी मर्यादा (Fund Limit) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सोबतच्या निधी वितरणाच्या तक्त्यानुसार PFMS कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत शासनाकडुन प्राप्त झालेल्या निधीचे प्रमाण विचारत घेऊन सन २०२२-२३ साठी जिल्हयाच्या मंजुर वार्षिक कृती आरखडयानुसार खालीलप्रमाणे निधी मर्यादा (Fund Limit) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. पुढील टप्प्यात शासनाकडुन निधी उपलब्ध झाल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

## जिल्हानिहाय PFMS कार्यप्रणालीमध्ये प्रस्तावित निधीची मर्यादा (Fund Limit)

(रु. लाखात)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | सन २०२२-२३ करीता मंजुर वार्षिक कृती आराखडा (AAP) | या आदेशाव्दारे वितरीत करावयाचे निधी मर्यादा (Fund Limit) |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | ३१६७.९८ | ३४८.४८ |
| २ | अकोला | २८३६.७७ | ३१२.०४ |
| ३ | अमरावती | ३८२८.२१ | ४२१.१० |
| ४ | औरंगाबाद | २९६३.९६ | ३२६.०४ |
| ५ | बीड | २२०६.१० | २४२.६७ |
| ६ | भंडारा | ३०६३.७२ | ३३७.०१ |
| ७ | बुलढाणा | ३८६४.०८ | ४२५.०५ |
| ८ | चंद्रपुर | ३७९७.१५ | ४१७.६९ |
| ९ | धुळे | १७२४.२९ | १८९.६७ |
| १० | गडचिरोली | २४४७.६७ | २६९.२४ |
| ११ | गोंदीया | २२१५.१७ | २४३.६७ |
| १२ | हिंगोली | २०३९.३० | २२४.३२ |
| १३ | जालना | २१०४.०८ | २३१.४५ |
| १४ | जळगाव | ४०७०.७३ | ४४७.७८ |
| १५ | कोल्हापुर | ३७००.९३ | ४०७.१० |
| १६ | लातुर | ३३३३.७७ | ३६६.७२ |
| १७ | नागपुर | ३४२४.११ | ३७६.६५ |
| १८ | नांदेड | २९८३.७० | ३२८.२१ |
| १९ | नंदुरबार | २२२६.८५ | २४४.९५ |
| २० | नाशिक | ३३५५.९६ | ३६९.१६ |
| २१ | उस्मानाबाद | १७५१.५६ | १९२.६७ |
| २२ | पालघर | १८८७.८५ | २०७.६६ |
| २३ | परभणी | २८०९.५९ | ३०९.०६ |
| २४ | पुणे | ३५११.५० | ३८६.२६ |
| २५ | रायगड | २८७६.३१ | ३१६.३९ |
| २६ | रत्नागिरी | २०७७.४९ | २२८.५२ |
| २७ | सांगली | २७३६.८९ | ३०१.०६ |
| २८ | सातारा | २६४१.९८ | २९०.६२ |
| २९ | सिंधुदुर्ग | १३२६.३० | १४५.८९ |
| ३० | सोलापुर | २६५४.१५ | २९१.९६ |
| ३१ | ठाणे | १७४८.५४ | १९२.३४ |
| ३२ | वर्धा | २१७७.३५ | २३९.५१ |
| ३३ | वाशिम | २३६०.३३ | २५९.६४ |
| ३४ | यवतमाळ | ३३९६.३५ | ३७३.६० |
| | एकुण | | १०२६४.१८ |

खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून खर्च करण्यात यावा.

अटी व शर्ती

१. सदर कार्यक्रमातील कामे सूरु करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घ्यावी.
२. सदर अनुदान राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ च्या मंजुर वार्षिक कृती आराखडयानुसार वितरीत करण्यात येत असून लेखाशिर्ष व उपलेखाशिर्षनिहाय आपल्या जिल्हयाच्या भौतिक व आर्थिक लक्षांकानुसार मंजूर तरतूदीच्या मर्यादेत खर्च करावा.
३. निधी प्राप्त होताच त्वरीत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्तींचे माहे सप्टेंबर २०२२ पर्यतचे मानधन तसेच अधिकारी / कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर २०२२ पर्यतचे वेतन व भत्ते, TA & DA प्रामुख्याने अदा करण्यात यावे.
४. सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन अदा करताना ज्या जिल्हयांचे सन २०२२-२३ मधील मंजुर वार्षिक कृती आराखडयातील आर्थिक तरतुद संपलेली असली तरीही माहे सप्टेंबर २०२२ पर्यतचे सर्व मानधन अदा करण्यात यावे. त्यानंतर ज्या जिल्हयांचे समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधना करीता वार्षिक कृती आराखडयामधील मंजुर नियतव्ययापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. त्या जिल्हयांनी Re-Appropriation चा प्रस्ताव त्वरीत राज्य अभियान व्यवस्थापन कक्षेस सादर करावा.
५. सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्तींचे मानधन अदा करताना दुबार अदायगी होणार नाही, तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणेच मानधन अदायगी होईल याची काळजी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी घ्यावी.
६. या आदेशाव्दारे वितरीत करण्यात येणा-या निधी मर्यादामधुन कमीतकमी ५०% निधी हा समुदाय निधी (Community Funds) करीता नियमानुसार व पात्रता तपासून वितरीत करण्यात यावा व शिल्लक राहणा-या निधी मर्यादेमधुन वार्षिक कृती आराखडयातील मंजुरबाबींवर उपलब्ध निधीचे मर्यादेत खर्च करण्यात यावा.
७. निधी मर्यादा प्राप्त होताच त्वरीत निधी खर्च होईल याचे नियोजन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी करावे.
८. क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षणाकरीता राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत वितरीत केलेल्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे सदर बाबीवर खर्च करण्यात यावा.
९. प्राप्त अनुदानामधुन झालेल्या खर्चाची स्वाक्षांकित माहिती या कार्यालयास पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत सादर करावी तसेच सदर माहिती / finance@umed.in या ई-मेल आयडी वर देखील पाठविण्यात यावी.
१०. प्राप्त निधीसाठी जमा / खर्चाचे द्वीनोंदी लेखा पध्दती (Double Entry System) मध्ये स्वतंत्र लेखे ठेवावेत.
११. सदर खर्चाचे महालेखापाल / सनदी लेखापाल तसेच अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षण करण्यात येणार आहे त्याअनुषंगाने आवश्यक लेखे अद्यायावत ठेवावेत.
१२. जिल्हयाला PFMS कार्यप्रणालीमध्ये निधीची मर्यादा प्राप्त होत असल्यामुळे प्रत्येक जिल्हयांने PFMS कार्यप्रणालीचा अवलंब करणे आवश्यक आहे.
१३. जिल्हयांना PFMS कार्यप्रणालीमध्ये Single Nodal Agency (SNA) च्या मार्गदर्शक सुचनांचा तंतोतंत अवलंब करणे बंधनकारक आहे.
१४. देयकांमधील करविषयक तसेच संविधानिक वजातीच्या रक्कमांचा भरणा करणेबाबत देयकनिहाय वजातीच्या रक्कमांचा तपशिल आपले स्तरावर जतन करुन ठेवण्यात यावा व योग्य प्राधिकरणाकडे विहित मुदतीत नियमित भरणा करण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक यांची राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

प्रत माहितीस्तव -:

१. मा. अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई, नागपूर
३. उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अवर सचिव, योजना ३, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उपआयुक्त विकास, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व

प्रत कार्यवाहीस्तव -:

१. जिल्हा अभियान सहसंचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व जिल्हे
२. जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व जिल्हे
३. लेखाधिकारी, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, सर्व जिल्हे